# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## परिपत्रक

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मधील कलम - 133(1) अन्वये विद्यापीठाचे वित्तीय वर्ष सुरू होण्यापूर्वी कमीत कमी दोन महिने अगोदर विद्यापीठाचा पुढील वित्तीय वर्षाचा अर्थसंकल्प तयार करण्याची तरतुद आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठ पदव्युत्तर अधिविभाग प्रमुख / प्रशासकीय विभाग प्रमुख / संचालक / समन्वयक यांना कळविण्यात येते की, सन 2019-20 चे सुधारीत अंदाजपत्रक व सन 2020-2021 च्या वार्षिक अंदाजपत्रकात आपल्या अधिविभाग / विभागाला आवश्यक असणारी आर्थिक तरतुद करण्याकरीता आपल्या विभागाच्या Login वर Online पध्दतीने माहिती दि. 15-10-2019 पूर्वी नोंदविण्यात यावी.

माहिती नोंदवताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**1.** सन 2019-2020 च्या सुधारित अंदाजपत्रकात समाविष्ठ करावयाची आर्थिक तरतुद योग्य त्या स्पष्टीकरणासह भरावी. त्यामध्ये अंदाजपत्रकीय शिर्षकानुसार दि. 30-09-2019 अखेर Reconciled झालेला प्रत्यक्ष खर्च व दि. 01-10-2019 ते दि. 31-03-2020 या कालावधीचा वस्तुनिष्ठ अपेक्षित खर्च, मुळ मंजुर तरतुदीपेक्षा कमी / जास्त खर्चाच्या कारणमिमांसे सह माहिती भरण्यात यावी.

**2.** अ. आपल्या विभाग / अधिविभागाला आर्थिक वर्ष 2020-2021 मधील आवश्यक खर्चाकरिता लागणा-या आर्थिक तरतुदी करिता माहिती भरावी.

ब. देखभाल अंदाजपत्रकात (Maintenance Budget) आवर्ती व अनावर्ती (Recurring & Non Recurring) खर्चाची मागणी विहित शिर्षकाखाली भरावी.

क. अधिविभागामध्ये शिकविले जाणारे अभ्यासक्रम, त्याचे मान्यताप्राप्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी याची माहिती स्वतंत्र तक्त्यात दयावी.

ङ अधिविभागामध्ये शिकविले जाणा-या अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता व प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची गेल्या दोन वर्षाची माहिती दयावी.

**3.** विभाग / अधिविभागाची सन 2019-2020 या वर्षाची दि. 30-09-2019 ची प्रत्यक्ष जमा दाखवणेत आली आहे. तेंव्हा दि. 01-10-2019 ते 31-03-2020 या कालावधीची सुधारित अपेक्षित जमा आणि सन 2020-2021 मधील बाबवार वार्षिक अपेक्षित जमा (फी व इतर जमा) याची माहिती भरण्यात यावी.

**4.** आस्थापना विभागाने पगारपत्रके विभागाच्या सहाय्याने वेतन अनुदान योजनेखाली, विद्यापीठ जनरल फंडातून व इतर फंडातून भरलेल्या व भरावयाच्या शिक्षक व शिक्षकेतर पदांचा बाबवार जमा व खर्च याविषयी माहिती भरून द्यावी.

**5.** स्थापत्य / विद्युत विभाग, भांडार विभाग व वाहन विभागाने देखभाल अंदाजपत्रकामध्ये त्या त्या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली कराव्या लागणा-या तरतुदी संबंधी देखभाल व दुरूस्तीच्या कामांची ढोबळ अंदाजपत्रके तयार करून माहिती भरून द्यावी.

**6.** संशोधन व विकास निधी (R & D Fund) तसेच घसारा निधी (Depreciation Fund) किंवा जनरल फंडातून घ्यावयाच्या विकास कामांचे ढोबळ अंदाजपत्रक तयार करून आवश्यक त्या निधीची मागणी करावी. त्याचप्रमाणे घ्यावयाच्या कामांची निकडही विषद करावी.

**7.** यु. जी. सी., केंद्रशासन, राज्यशासन व इतर संस्थेने मंजुर केलेले विकास प्रकल्प / योजने खाली सन 2019-20 ची सुधारित भांडवली खर्चाविषयी तरतुदीबाबत स्थापत्य व विद्युत विभाग, भांडार विभाग व महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागाने ज्या त्या अधिविभाग / प्रशासकिय विभागाच्या सहमतीने, एकत्रित माहिती भरून द्यावी.

**8.** विद्यापीठ अनुदान आयोगाकडून, केंद्रशासनाकडून, तसेच राज्यशासन व इतर यंत्रणेकडून, निरनिराळया अधिविभाग / प्रशासकिय विभागामध्ये मंजुर व प्रगतिपथावर असलेले प्रकल्प / योजनेविषयी बाबवार मंजुर अनुदान, प्रकल्प कालावधी दि. 31 मार्च 2019 अखेर अखर्चित रक्कम, सन 2019-2020 मधील सुधारित अपेक्षित जमा व खर्च व सन 2020-2021 मधील अपेक्षित जमा व खर्च अंदाजपत्रकीय शिर्षकासह सविस्तर माहिती ज्या त्या अधिविभागाने / प्रशासकिय विभागाने स्वतंत्र तक्त्यात तयार करून महाविद्यालय व विद्यापीठ विकास विभागामार्फत संवर्गनिहाय एकत्रित करून अंदाजपत्रक विभागास सादर करावी.

**9.** ठेवी, तसलमात / अध्यासन फंड व इतर फंडाबाबत माहिती संबधित विभागाने तसेच वित्त व लेखा विभागाने सादर करावी.

**10.** लेखन सामग्री करीता कराव्या लागणा-या तरतुदी विषयी तपशील स्वतंत्ररित्या संगणकिय प्रतीत (Soft copy) त्या त्या अधिविभागाने / प्रशासकिय विभागाने भांडार विभागाकडे द्यावा. तद्नंतर भांडार विभागाने सदरची माहिती त्या त्या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली संकलीत करून अंदाजपत्रकीय विभागास सादर करावी.

सन 2020 - 21 च्या अंदाजपत्रकासाठी आपल्या विभागाकरीता आवश्यक आर्थिक तरतुदी याची माहिती विद्यापीठ संकेत स्थळावरून Online पध्दतीने भरून सादर करावयाची आहे. यासाठी आपल्या विभाग / अधिविभागास स्वतंत्र Login देवून User ID याची माहिती यापूर्वी दिलेली आहे. त्यानुसार आपण अंदाजपत्रक online पध्दतीने भरून सादर करावे. Online पध्दतीने माहिती भरताना काही अडचणी असल्यास अंदाजपत्रक विभागाकडे संपर्क साधावा.

वित्त व लेखा अधिकारी

शिवाजी वि./लेखा अंदाजपत्रक/ 402

दिनांक :- 19 SEP 2019

प्रति,

1) सर्व अधिविभागप्रमुख,

2) सर्व प्रशासकिय विभाग प्रमुख

प्रत माहितीसाठी

1) सर्व स्वीय सहायक

मा. कुलगुरू / मा. प्र-कुलगुरू / मा. कुलसचिव / मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ / मा. वित्त व लेखा अधिकारी

2) सर्व उपकुलसचिव / सहा. कुलसचिव.

3) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाचे वेबसाईटवर (इंट्रानेटवर) ठेवावे.